# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ४०-२२** **दिनांक ०४/०२/२०२२**

## वालीव गुन्हेप्रकटीकरण शाखेकडुन गांजा विक्री करणारा सराईत आरोपी अटक, ५५,३८०/- रुपये किंमतीचा ४ किलो गांजा जप्त.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात १५ दिवस "अँन्टी ड्रग ड्राईव्ह" ही अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबवली जात आहे. त्या अनुषंगाने वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०३/०२/२०२२ रोजी १५.४५ वाजताचे दरम्यान वालीव पोलीस ठाणे हद्दीतील स्मशानभुमी शेजारी, माधवनगर, मौर्या नाका, सातिवली येथे गांजा हा अंमली पदार्थ रब्बानी नावाचा इसम स्वतःच्या राहत्या घरात बेकायदेशीररित्या ठेवुन विक्री करत असल्याची गुप्त माहीती मिळाली. सदर कारवाई करणेबाबत पोलीस उप आयुक्त यांनी आदेश दिल्याने पोनि/राहुलकुमार पाटील तसेच गुन्हेप्रकटिकरण अधिकारी व अंमलदार यांचेसह कारवाई करणे कामी टिम तयार करुन सातिवली येथील माधवनगर, स्मशान भुमी जवळील रब्बानी यांच्या घराची झडती घेतली असता आरोपी इसम नामे रब्बानी शब्बीर खाटीक वय-३९ वर्षे रा.माधवनगर, स्मशान भुमी शेजारी, मौर्या नाका वसई पुर्व ता.वसई, जि.पालघर. हा स्वतःहाच्या राहत्या घरात ४ किलो वजनाचा गांजा एकुण ५५,३८०/- **रुपये** किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ बेकायदेशीर बाळगत असतांना मिळुन आला. सदर बाबत वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं.१३६/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (क),२० (ब) II (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील कामगीरी श्री. संजयकुमार पाटील पोलीस उप आयुक्त परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना.सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, पो.अंम.गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

---000---